लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली
"बी" पुनर्मुल्यांकित महाविद्यालय
राजनेमी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली –४१६४१६
फोन – (०२३३) २३७५०७५ फॅक्स – (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)

जा.क.एनडीपीएनसी / दिनांक:– / /

# दाखला

दाखला देण्यात येतो की, या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सन २०१६–२०१७ या शैक्षणिक वर्षात नियमित कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात खालील उपक्रम राबवले आहेत.

| | |
|---|---|
| १) दि. २५/०१/२०१६ | रोजी राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम |
| २) दि. २८/०१/२०१६ | विद्यार्थी स्वयंसेवक प्रबोधन – प्रा. शिवप्रसाद शेटे |
| ३) दि. ०१/०७/२०१६ | वृक्षारोपन कार्यक्रम प्र. प्राचार्य डॉ. एस. डी. पाटील |
| ४) दि. ११/०७/२०१६ | जागतिक लोकसंख्या दिन– प्रा. पी. डी. पाटील |
| ५) दि. १५/०७/२०१६ | कौशल्य विकास कार्यशाळा – श्री. स्वप्निल शहा |
| ६) दि. २७/०७/२०१६ | डेन्टल चेकअप कॅम्प |
| ७) दि. २९/०७/२०१६ | डिजीटल लिट्रसी – प्रा. डॉ.संदीप रावळ |
| ८) दि. ०८/०८/२०१६ | विद्यार्थी प्रबोधन – प्रा. शिवप्रसाद शेटे |
| ९) दि. १३/०८/२०१६ | विद्यार्थी प्रबोधन NSS उदघाटन – प्राचार्य बापू जाधव |
| १०) दि. १४/०८/२०१६ | महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहिम |
| ११) दि. १५/०८/२०१६ | Flag Hosting Ceremony |
| १२) दि. १८/०८/२०१६ | रक्षा बंधन |
| १३) दि. ०६/०९/२०१६ | मॅनेजमेंट गेम्स – प्रा. शिवप्रसाद शेटे |
| १४) दि. ०७/०९/२०१६ | सदभावना दिवस निमित्त प्रबोधन – प्रा. शिवप्रसाद शेटे |
| १५) दि. १०/०९/२०१६ | घरगुती गणेश विसर्जन निर्मालय गोळा करणे |
| १६) दि. १५/०९/२०१६ | सार्वजनीक गणेश विसर्जन निर्मालय गोळा करणे |
| १७) दि. २७//०९/२०१६ | गर्दी नियंत्रण (मराठा मोर्चा) स्वयंसेवक सहभाग |
| १८) दि. २९/०९/२०१६ | रोजी राष्ट्रीय सेवा दिवस निमित्त व्याख्यान – प्राचार्य |
| १९) दि. ०२/१०/२०१६ | महात्मा गांधी दिनानिमित्त – व्याख्यान व श्रमदान |
| २०) दि. १३/१०/२०१६. | युवकांसाठी शासनाच्या योजना – व्याख्यान – वक्ते डॉ. बी. एस. पाटील |
| २१) दि. १६/१०/२०१६ | जागतिक अन्न दिन व्याख्यान – वक्ते प्रा. बी. ए. कोटलगी |
| २२) दि. ०१/१२/२०१६ | जागतिक एड्स दिन -- |
| २३) दि. ०५/१२/२०१६ | सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व |
| २४) दि. १२/०१/२०१७ | राष्ट्रीय युवा दिवस निमित्त युवकांची जबाबदारी –व्याख्यान व चर्चासत्र |
| २५) दि. १२/०१/२०१७ | सुर्यनमस्कार उपक्रमात स्वयंसेवकांचा सहभाग – प्रा. के. आर. गावडे |

लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली
"बी" पुनर्मुल्यांकित महाविद्यालय
राजनेगी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली –४१६४१६
फोन – (०२३३) २३७५०७५ फॅक्स – (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)

जा.क्र.एनडीपीएनसी./ दिनांकः– / /

| | |
|---|---|
| २६) दि. १६/०१/२०१७ | कौशल्य विकास कार्यशाळा व प्रबोधन – वक्ते प्रा. शिवप्रसाद शेटे |
| २७) दि. २१/०१/२०१७ | मतदार जागृती Rally मध्ये सहभाग – प्रा. बी. ए. कोटलगी |
| २८) दि. २५/०१/२०१७ | महाविद्यालयातील परिसर स्वच्छता |
| २९) दि. २६/०१/२०१७ | प्रजासत्ताक दिन |
| ३०) दि. २७/०१/२०१७ ते ०१/०२/२०१७ | विशेष श्रमसंस्कार शिबिर निमित्त प्रबोधनपर कार्यक्रम – प्रा. शिवप्रसाद शेटे |
| ३१) दि. ०३/०२/२०१७ ते ०९/०२/२०१७ | विशेष श्रमसंस्कार शिबिर मु. पो. आरवडे ता. तासगाव |
| ३२) दि. १२/०२/२०१७ | व्यसनाधिनता एक सामाजिक समस्या व्याख्यान – वक्ते प्रा. पी. डी. पाटील |
| ३३) दि. २०/०२/२०१७ | जैवविविधता कार्यशाळा – प्रा. सुहास वायंगणकर |
| ३४) दि. २६/०२/२०१७ | स्वातंत्र्य चळवळीतील सांगलीचे योगदान व्याख्यान – वक्ते प्रा. बी. ए. कोटलगी |
| ३५) दि. ११/०३/२०१७ | मानवीहक्क कार्यशाळा सहभाग |
| ३६) दि. २७/०३/२०१७ | कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि निवारण कायदा कार्यशाळा – वक्ते सौ स्नेहा वालवडकर |
| ३७) दि. २९/०३/२०१७ | राष्ट्रीय एकात्मता व्याख्यान – प्रा. डॉ. गौतम ढाले |

Shivprasad Shete
(NSS. Programme officer)

(डॉ. एस. डी. पाटील)
प्रभारी प्राचार्य

ल.ए.सोसायटीचे

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, सांगली

## राष्ट्रीय सेवा योजना

### नियमित कार्यक्रम अहवाल २०१६—१७

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून आमच्या महाविद्यालयास १०० स्वयंसेवकांचे एक युनिट मंजूर करणेत आले आहे.

**राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक नोंदणी :—** शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यानी सहभागी व्हावे यासाठी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर नोटीस लावणेत आली होती. तसेच ही नोटीस सिनियर महाविद्यालयाच्या वर्गात फिरवली होती. या नोटीस मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची थोडक्यात माहिती दिली होती. त्या अनुषंगाने रितसर प्रवेश अर्ज भरून घेऊन प्रथम आणि व्दितीय वर्षासाठी १०० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार अनुसूचित जाती व अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले आहे.

**उदघाटन :—** राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाविद्यालयातील विविध मंडळे असा संयुक्त उद्घाटन समारंभ मा.प्राचार्य बापू जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा सर्वगुण संपन्न सक्षम नागरीक बनतो तसेच सामाजिक बांधिलकितून तो समाजसेवक बनतो असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस.डी.पाटील विविध मंडळाचे निमंत्रक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रबोधन शिबीर :—** राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे तीन दिवस प्रबोधन शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नियमित कार्यक्रमातंर्गत आणि विशेष शिबीराव्दारे कोणकोणते उपक्रम राबवले जातात या विषयी

स्वयंसेवकांना सविस्तर माहिती देणेत आली. त्याच प्रमाणे या विभागाची सुरवात कशी झाली. एन.एस.एस. मध्ये सहभागी झाल्यानंतर कोणकोणते फायदे होतात. या विषयी माहिती देणेत आली. राष्ट्रीय सेवा योजनेत यशस्वीपणे २४० तास पूर्ण करणा–या आणि विशेष शिबीरामध्ये सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून अंतिम परीक्षेत १० गुंण अधिक दिले जाणार असल्याची माहितीही विद्यार्थ्यांना देणेत आली. याचबरोबर वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कोणकोणते उपकम राबवले जाणार आहेत. याचे नियोजन स्वयंसेवकांना सांगितले.

**श्रमदान, साफसफाई, स्वच्छता :–** महाविद्यालयाने एन.एस.एस.चे विविध उपकम राबवण्यासाठी आरवडे ता.-तासगांव जि.सांगली. हे गाव दत्तक खेडे म्हणून निवडले आहे. दत्तक खेडे आरवडे याबरोबरच महाविद्यालय परिसर स्वच्छता व साफसफाई, झाडाना आळी करणे व पाणी देणे, गाजर गवत निर्मुलन अशी श्रमदानाची कामे केली आहेत.

दंत चिकित्सा शिबीर, साक्षरता, पर्यावरण, एडस जनजागृती, लेक वाचवा इत्यादी विषयावर पोस्टर प्रेझेन्टेशंन, हेल्थ चेकअप कॅंप विविध विषयांवरील व्याख्याने उदा. लोकसंख्या दिन, भारतातील साक्षरता, स्त्री सबलीकरण, जागतिक अन्न दिवस, जागतिक एडस दिन, मानवी हक्क, हुतात्मा दिन, जागतीक महिला दिन इ. दिन साजरे करण्यात आले. जैव विविधता आणि कचरा व्यवस्थापन या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. कृष्णाघाट साफसफाई, गणपती विसर्जन निर्माल्य गोळा करणे हा कार्यक्रम घेण्यात आला.

**इतर कार्यक्रम :–** व्याख्याने श्रमदानाच्या कामाबरोबरच वर्षभरामध्ये एन.एस.एस. तर्फे इतरही कार्यक्रम राबवण्यात आले आहेत. पर्यावरण जनजागृती मोहिम, प्रचार फेरी, मतदार जागृती प्रचार फेरी, मॅनेजमेंट गेम्स इ. सारख्या वैशिष्टयपूर्ण कार्यक्रम पार पाडले. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी विविध व्याख्याने, विविध चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात आले होते.

**विशेष श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग :–** दिनांक ०३/०२/२०१६ ते ०९/०२/२०१६ या कालावधीत मु.पो.- आरवडे.ता. तासगांव जि. सांगली या ठिकाणी संपन्न झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी अभूतपूर्व उत्साहाने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमांतर्गत "स्वच्छ भारत - स्वस्थ भारत" या शिर्षकांतर्गत काम करताना विद्यार्थ्यांनी आरवडे गावामध्ये बगिचा स्वच्छता मोहिम, ग्रामस्वच्छता अभियान, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, झाडांना आळी करणे, मंदीर स्वच्छता श्री.राधागोपाल मंदीरातील पाण्याची टाकी सफाई, कारंज्याची तांत्रिक दुरुस्ती इ. कामामध्ये उस्फुर्त सहभाग घेतला. गावकऱ्यांचे प्रबोधन करणे, प्रभातफेरी इ. उपक्रम पार पाडले.

**आभार** :— वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम व्यवस्थितपणे राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. डी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग,समिती सदस्य, प्रशासकीय सेवक, आरवडे ग्रामपंचायतीचे मा. सरपंच, मा.उपसरपंच, मा.ग्रामसेवक व विद्यार्थी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठातील एन.एस.एस. विभागातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे सक्रीय सहकार्य लाभले त्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार.

प्रा.शिवप्रसाद शेटे
प्रोग्रॅम ऑफीसर

(डॉ. एस. डी. पाटील)
प्रभारी प्राचार्य

ल.ए.सोसायटीचे

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर सन २०१६–१७

## अहवाल

## ०३/०२/२०१७ ते ०९/०२/२०१७

गतवर्षी प्रमाणे चालू शैक्षाणिक वर्षामध्ये आमच्या महाविद्यालयाचा विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक ०३/०२/२०१६ ते ०९/०२/२०१६ या कालावधी मध्ये मु.पो.- आरवडे ता. तासगांव जि. सांगली या ठिकाणी उत्साहात पार पडले.सदर शिवीर प्रसंगी महाविद्यालयाच्या राष्टीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनीं अनेक कार्यकमामधून भाग घेतला.

दि.०३/०२/२०१६ रोजी महाविद्यालयातून ५० स्वयंसेवक शिवींर स्थळी रवाना झाले.शिवीरार्थीची राहणेची व्यवस्था आरवडे गावातील श्री श्री राधागोपाल मंदिरामध्ये करण्यात आली होती. पहिल्याच दिवशी शिवीराच्या उदघाटनाचा कार्यकम पार पडला. या प्रसंगी उद्घाटक म्हणून गावच्या संरपंच सौ. छायाताई म्हस्के ग्रामसेवक श्री विजय म्हैसकर उपस्थित होते. कार्यकमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस.डी.पाटील यांनी भूपविले सदर कार्यकम पसंगी श्री.राधागोपाल मंदीरातील वरिष्ठ सदस्य श्री रूपरघुनाथ दास हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तर कार्यकमाच्या समारोप प्रसंगी प्रा.वी.वी.पाटील यांनी आभार मानले.

दि.०४/०२/२०१७ रोजी शनिवारी शिवीरार्थीनी सकाळी ५.३० ते ६.३० व्यायाम व प्राणायाम करून गावामध्ये प्रभात भ्रमण केले त्यानंतर सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत श्री. राधागोपाल मंदिरामध्ये बगीचा स्वच्छता मोहिम पार पडली. संध्याकाळी सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये शिबिरार्थींनी सहभाग घेतला.

दि. 5/02/2016 रोजी रविवारी शिबिरार्थींनी नियमित प्रातःकालीन व्यायामानंतर श्री. भक्तीवेदांत मार्गाची सफाई केली तसेच रविवारी मंदिरामध्ये झालेल्या प्रसाद वितरणाच्या कार्यक्रमाध्ये प्रसाद वितरण देखिल केले संध्याकाळी " मननियंत्रण आणि अभ्यास तंत्र" या विषयावर श्री. दिनानाथगोप दास ब्रम्हचारी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

दि. 06/02/2017 बुधवार रोजी सकाळच्या नियमित कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी श्री. राधा गोपाळ मंदिर परिसरातील झाडांना आळी केली. संध्याकाळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला.

दि. 07/02/2017 गुरूवार रोजी शिबिरार्थीच्या नियमित कार्यक्रामानंतर आरवडे गावातील ग्रंथालय परीसर भेट, ग्रामपंचायत पदाधिकारी भेट, गावक–यासाठी संवाद इ. कार्यक्रम पार पडले. संध्याकाळी श्री. ज्ञानेश्वर धनवडे यांनी Banking साठी उपयुक्त कौशल्य या विषयावर व्याख्यान दिले.

दि. 08/02/2017 शुक्रवार प्रातःकालीन कार्यक्रमानंतर शिबिरार्थींनी राधा गोपाळ मंदिराच्या परीसरातील कारंजाची तांत्रिक दुरूस्ती तसेच स्वच्छता पुर्ण केली ग्रामसेवक श्री. विजय म्हैसकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

दि. 09/02/2017 रोजी शनिवार शिबिरार्थींनी प्रातःकालीन कार्यक्रमानंतर पिरबाबा राजासाब गार्डनची सफाई तसेच तेथील झाडांना अळी करणे इ. कामे पुर्ण केली. दुपारी श्री. सुरेश पाटील रा आंरवडे यांचा काव्य वाचनाचा कार्यक्रम पार पडला संध्याकाळी शिबिराचा समारोप महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. डी. पाटील यांच्या उपस्थितित पार पडला

प्रा.शिवप्रसाद शेटे
प्रोग्रॅम ऑफीसर

(डॉ. एस. डी. पाटील)
प्रभारी प्राचार्य